नि.फौ.ख.क्र. ११/२०२४
निशाणी १२

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची जबानी**

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,
माझे नाव – गणपत सखाराम माधव
वय सुमारे – ५२ वर्षे, व्यवसाय–शेती
निवासस्थान–वेतोबा मंदिरजवळ, वेंगुर्ला,
ता. वेंगुर्ला, जिल्हा– सिंधुदुर्ग.

**सरतपास सहायक सरकारी वकील श्रीमती ए.ए.पवार यांच्या मार्फत सुरु–**

**०१.** दिनांक १३/०१/२०२४ रोजी पोलीसांनी मला वेतोबा मंदिर येथे पंचनामा करण्याकरीता बोलविले होते. त्यावेळी मला व प्रकाश राणे यांना पोलीस अधिकारी यांनी रघुनाथ यशवंत राऊळ यांच्या घरी नेले. त्यावेळी पोलीसांनी मला सदर घरामध्ये चोरी झालेली आहे असे सांगितले. त्यावेळी भाग्यश्री रघुनाथ राऊळ यांनी मला घटनास्थळ दाखविले. घटनास्थळावरील घराच्या दक्षिणबाजूकडील जागा ही सिमेंटच्या पत्र्यांनी झाकलेली होती. सदर दक्षिण बाजूकडील लोखंडी जाळी तोडून त्यामधून लाकडी दोन कपाटे चोरीस गेल्याचे आम्हास निदर्शनास आले. घटनास्थळाच्या पुर्वेस वेतोबा मंदिरकडे जाणारा रस्ता, पश्चिमेस सिध्देश राऊळ यांचे घर, उत्तरेस चंद्रकांत राऊळ यांचे घर व दक्षिणेस वेंगुर्ला मालवण सागरी महामार्ग आहे. पंचनामा हा सकाळी ११.४५ ते १२.४५ वाजताच्या सुमारास करण्यात आला. पंचनाम्यावरील नकाशा हा पोलीसांनी आमच्या समक्ष काढलेला होता. पंचनाम्यातील मजकूर मी वाचून पाहिला व तो खरा व बरोबर असल्याची खात्री झाल्यानंतर मी त्यावर सही केली. (साक्षीदाराला दि. १३/०१/२०२४ रोजीचा घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला.) त्यावर अनु.क्र.२ वरील सही माझी आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. (घटनास्थळ पंचनाम्यास **निशाणी– पी–१/पीडब्ल्यू१** देण्यात येते.) सदर दिवशी दुपारी १.०० ते १.३० वाजताच्या सुमारास पोलीसांनी आम्हाला पुन्हा दुसऱ्या पंचनाम्यावर साक्षीदार म्हणून हजर राहण्यास तयार आहे काय ? असे विचारले असता आम्ही त्यास संमत्ती दर्शविली. त्याअनुषंगाने मी, पोलीस अधिकारी शेडगे व डिसोजा, प्रकाश राणे व भाग्यश्री राऊळ असे सर्वजण भरत यशवंत राऊळ यांच्या घरी गेलो. तेथे चोरीस गेलेली कपाटे आढळून आली. सदरील कपाटे बाहेर घेवून तेथे पंचनामा करण्यात आला व त्यावर आमच्या सह्या घेण्यात आल्या. सदर ठिकाणी एकूण दोन लाकडी कपाटे मिळून आली होती.

त्यापैकी एका कपाटात काचेचे स्लाईडींग व दुसऱ्या कपाटास स्टीलचे स्लाईडींग होते. पोलीसांनी त्यावेळी माझ्यासमक्ष पंचनामा केला. पंचनाम्यातील मजकूर मी वाचून पाहिला व तो खरा व बरोबर असल्याची खात्री झाल्यानंतर मी त्यावर सही केली. (साक्षीदाराला दि. १३/०१/२०२४ रोजीचा जप्ती पंचनामा दाखविण्यात आला.) त्यावर अनु.क्र.२ वरील सही माझी आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. (जप्ती पंचनाम्यास **निशाणी– पी–२/पीडब्ल्यू१** देण्यात येते.)

**सरतपास पूर्ण.**

**मध्यंतराची वेळ झाल्याने उलटतपास मध्यंतरापर्यत तहकूब.**

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/–

दिनांक– ०९/०९/२०२५ (एस.जे.चिवटे)
न्यायदंडाधिकारी वर्ग १, वेंगुर्ला.

**मध्यंतरानंतर उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री.पी.एम.सामंत यांचेमार्फत शपथेवर सुरु–**

**०२.** मला पंचनामा करण्याकरीता पोलीस डिसोजा यांनी बोलाविले होते. मला पोलीसांनी बोलाविले त्यावेळी मी माझ्या घरी होतो. पोलीसांनी अंदाजे सकाळी ११.०० वाजताच्या सुमारास माझ्या घरी मला बोलविणेकरीता माणूस पाठविला होता. माझ्या घरापासून घटनास्थळ अंदाजे दोन किलोमीटर अंतरावरती आहे. प्रकाश राणे यांच्या घरापासून घटनास्थळ अंदाजे ४ किलोमीटर अंतरावरती आहे. घटनास्थळाच्या समोर अंदाजे १० फूट अंतरावर मालवण ते वेंगुर्ला जाणारा सागरी महामार्ग आहे. घटनास्थळाच्या समोरील महामार्गाला लागून वेतोबा मंदिर आहे. वेतोबा मंदिरास लागून तीन ते चार दुकाने आहेत. घटनास्थळाच्या बाजूस पश्चिम दिशेस अंदाजे १०० फूट अंतरावरती ग्रामपंचायत कुशेवाडा, तलाठी ऑफीस कुशेवाडा व सरकार मान्य रेशन दुकान आहे. घटनास्थळाच्या बाजूस पुर्वेस अंदाजे १५ फूट अंतरावरती वेतोबा मंदिर ते कुशेवाडा जाणारा रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळाच्या बाजूस हाकेच्या अंतरावरती १५ ते २० राहती घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळाच्या बाजूस वर्दळ असते. हे म्हणणे खरे आहे की देऊळवाडी परिसरात अंदाजे ४० ते ५० राहती घरे आहेत.

**नि.फौ.ख.क्र. ११/२०२४**
**निशाणी १२**

**०३.** हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळावरील घर हे यशवंत रघुनाथ राऊळ यांच्या नावे आहे. हे म्हणणे खरे आहे की फिर्यादी ही यशवंत राऊळ यांची सून आहे. हे म्हणणे खरे आहे की आरोपी हा यशवंत यांचा मुलगा असून फिर्यादी हिचा दिर आहे. हे म्हणणे खरे आहे की यशवंत राऊळ यांच्या मिळकतीचे त्यांच्या वारसांमध्ये वाटप झालेले नाही. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळावरील घर क्र.५१६ हे दोन भागामध्ये विभागलेले असून एका भागामध्ये फिर्यादी राहते व दुसरा भाग हा स्टोअर रुम म्हणून वापरला जातो. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळ हे घर क्र. ५१६ मधील स्टोअर रुममध्ये आहे. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळ भागामध्ये आरोपीची पुर्वी पिठाची गिरण होती. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळ भागामध्ये पिठाच्या गिरणीपुर्वी गणपती बनविण्याची शाळा होती. फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये जमिनीवरुन वाद आहेत किंवा कसे हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की पंचनाम्यामध्ये मुद्देमाल हा आरोपीच्या घरामधून जप्त करण्यात आला असे कोठेही नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासातील नमूद मजकूर हा खोटा आहे. हे म्हणणे खरे आहे की ज्या ठिकाणी जप्ती पंचनामा करण्यात आला तेथे रस्ता असून तो रहिवाशी वस्तीमध्ये जातो व तेथे वर्दळ असते.

**०४.** हे म्हणणे खरे आहे की पंचनामा हा पोलीसांनी लिहिला व त्यावर आम्ही सही केली. साक्षीदार स्वत:हून सांगतो की पोलीसांनी पंचनामा आम्हाला वाचून दाखविला होता. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळ पंचनाम्यामधील नकाशामध्ये जाळी कोठे तोडण्यात आली याचा स्पष्ट उल्लेख नाही. हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासामधील संपूर्ण मजकूर खोटा असून मी आजरोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/-

दिनांक- ०९/०९/२०२५

(एस.जे.चिवटे)
न्यायदंडाधिकारी वर्ग १, वेंगुर्ला.